नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०९/२०२४ (रविवार) सकाळ**

## घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

नागपूर जिल्हा ग्रामीण उपविभाग सावनेर हद्दीमध्ये सतत दिवसा होत असल्याचे घरफोडी गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वात सदर गुन्हयाचे समांतर तपास करण्याचे आदेश दिले. त्यावरून पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांनी आपल्या अधिपत्याखाली अधिकारी व अंमलदार यांचे वेगवेगळे पथके तयार करून तपासाच्या सुचना दिल्या. दिनांक १४/०९/२०२४ रोजी पोलीस स्टेशन सावनेर अप. क्र. ७२१/२०२४ कलम ३३१(३), ३०५ (A) BNS तसेच सावनेर, कळमेश्वर, केळवद येथील इतर घरफोडी गुन्हयाचे समांतर तपास व आरोपीचा शोध स्थानिक गुन्हे शाखा करीत असताना गोपनीय बातमीदारा कडून मिळालेल्या माहिती वरून व तांत्रिक माहिती वरून पो.स्टे. सावनेर अप. क्र. ७२१/२०२४ कलम ३३१(३), ३०५(अ) भा.न्या. स. गुन्ह्यातील **पाहिजे आरोपी नामे कार्तिक सुरजभान बालगुहेर, वय २३ वर्षे, रा. चंद्रमणीनगर, अजनी, नागपूर** यास पो.स्टे. वाडी परिसरातून ताब्यात घेऊन त्याचेकडून सदर गुन्ह्यातील व इतर गुन्ह्यातील सोन्याची चैन, मंगळसूत्र, ३ अंगठ्या, ६४ मणी, कानातील टॉप्स आणि रिंग, असा एकूण ४३ ग्रॅम सोन्याचे दागिने किंमती ३,०१,०००/—रू. आणि वापरता मोबाईल किंमती १००००/—रू. असा एकूण ३,११,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपी इसमास गुन्ह्याचे पुढील तपासात पो.स्टे. सावनेर येथे मुद्देमालासह हस्तातरिंत केले. सावनेर पोलीसांनी सदर आरोपीस अटक केली आहे. सदर आरोपी पो.स्टे. अजनी अप. क्र. २००/२०२३ कलम ३९५, ४५२ भा.द.वी.r/w ३(१), ३(२), ३(४) MCOC मध्ये जामीनवर आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नी. ओमप्रकाश कोकाटे, स.पो.नी.किशोर शेरकी, स.पो.नी.मनोज गदाडे, स.पो.नी. आशिष ठाकूर, पो.हवा. राजू रेवतकर, पो.हवा. संजय बांते, पो.हवा.इक्बाल शेख, चा.पो.हवा.अमोल कुथे, पो.ना. देवा देवकते यांनी पार पाडली.



**उमरेड हद्दीत अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमांवर**
**स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई**

दि. १५/०९/२०२४ रोजी पोलीस ठाणे उमरेड हद्दीतील मौजा गरडेपार पारधी बेडा परिसरात मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून आजूबाजूचे परीसरात विक्री करणार असल्याची गोपनीय खबर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाल्याने पोस्टे उमरेड हद्दीतील मौजा गरडेपार पारधी बेडा येथे सुरू असलेल्या अवैधरीत्या गावठी पद्धतीने हातभट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या एकूण ०४ इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या गावठी पद्धतीने हातभट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे **१) ०३ महिला आरोपी व ०१ पुरूष नामे— गोवर्धन राजपूत रा. गरडेपार पारधी बेडा** यांचे ताब्यातून **१)** प्लॅस्टिक डबकित एकूण २६० लिटर मोहफुल गावठी दारू एकूण किंमती १३०००/—रू २)  २८०० लिटर मोहफुल सडवा रसायन एकूण किंमती ५६०००/—रू. व इतर दारू गाळण्याचे साहित्य किंमती ९०००/—रू. असा एकुण ७८०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे उमरेड यांचे ताब्यात देण्यात आले. त्याचे विरुद्ध कलम ६५ (ई), (फ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनी किशोर शेरकी, सपोनी मनोज गदादे, पोउपनि बटूलाल पांडे सफौ महेश जाधव, सफौ मिलिंद नांदुरकर, सफौ विनोद काळे, पोहवा ईकबाल शेख, पोहवा दिनेश अधापुरे, पोहवा रोशन काळे, पोहवा प्रमोद भोयर, पोहवा आशीष, मपोहवा नितु रामटेके मपोहवा कविता बचले, चापोहवा मुकेश शुक्ला, चापोशी शेषराव यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर